रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचे

# गोगटे - जोगळेकर वरीष्ठ महाविद्यालय, रत्नागिरी

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शिष्यवृत्ती विभाग

3 DEC 2021

## उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी शिष्यवृत्ती

### विद्यार्थ्यांसाठी सूचना

केंद्र शासनाच्या एन.एस.पी. पोर्टल द्वारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राज्यात महाविद्यालय व विद्यापीठामधील सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजनेची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर शिष्यवृत्ती उच्च माध्यमिक [इयत्ता १२ वी] परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त ( ८०% पेक्षा जास्त टक्के असलेल्या) विद्यार्थ्यांना व पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न ८,००,००० पेक्षा कमी असलेल्या विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी देण्यात येते. तसेच या शिष्यवृत्ती योजनेच्या लाभाची रक्कम केंदशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात ( **Under DBT Mode** ) जमा करण्यात येते. महाविद्यालय व विद्यापीठामधील सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत गुणवत्ता यादीनुसार खालीलप्रमाणे लाभ देय आहेत.

| अभ्यासक्रमाचा प्रकार | देय रक्कम |
|---|---|
| पदवी | रक्कम रु. १०,०००/- |
| पदव्युत्तर पदवी | रक्कम रु. २०,०००/- |
| पदवी व पदव्युत्तर एकत्रित | १. प्रथम ३ वर्षासाठी रक्कम रु.१०,०००/- |
| | २. पुढील ४ थे व ५ वे वर्षासाठी रक्कम रु.२०,०००/- |

सन २०२१-२२ करीता या योजनेसाठी एनएसपी पोर्टलवरुन ऑनलाईन अर्ज मागविण्याची प्रकिया सुरु झालेली असून विद्यार्थ्यांनी नॅशनल स्कॉलरशीप पोर्टलवर जावून www.scholarship.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत आता १५ डिसेबर २०२१ अशी झाली आहे.

फॉर्म भरुन झाल्यावर त्याची छापील एक प्रत कार्यालयात सौ.जान्हवी विचारे यांजकडे द्यावयाची आहे. मुदतीत छापील अर्जाची प्रत संबंधित कर्मचा-याकडे जमा न केल्यास त्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांवर राहील याची नोंद घ्यावी. शिष्यवृत्तीसाठी लागणारी कागदपत्रे खालीलप्रमाणे आहेत. छापील अर्जासोबत खालील झेरॉक्स प्रती जोडणे आवश्यक आहे.

०१. एच.एस.सी.गुणपत्रकाची झेरॉक्स सत्यप्रत - १

०२. चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड सर्टिफिकेट

०३. उत्पनाचा दाखला, आधारकार्ड

०४. बँक पासबुक झेरॉक्स सत्यप्रत - १

०५. जातीचा दाखला [लागू असल्यास]

प्र.प्राचार्य.